# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १६/०८/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा हेटी येथे दिनांक १४/०८/२०२२ चे २३.०० वा. ते दिनांक १५/०८/२०२२ चे ०६.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— उमराव बापूराव धांडे वय ५१ वर्ष, रा. वार्ड क्र. ३, हेटी ता. सावनेर हे लग्नाचे कार्यक्रम करीता नागपूरला गेले होते. त्यांचा मुलगा प्रज्वल उमराव धांडे हा घरी एकटा हजर होता. तो रात्री २३.०० वा. दरम्यान घराला कुलुप लावून फिर्यादीचे भाऊ सुधाकर धांडे याचे घरी झोपायला गेला. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे कुलुप तोडून घरात मध्ये प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरातील लोखंडी कपाटाचे कुलुप तोडून लॉकरमध्ये ठेवलेले जूने सोन्या—चांदीचे दागिने कि. २७,०००/—रु. व कालेज बॅग मध्ये ठेवलेले ४,०००/—रु. असा एकुण कि. ३१,०००/—रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र यादव मो.क्र. ८८८८८२१३९३ हे करीत आहे.

### चोरी

**१) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील कपुरबाहुली येथे दिनांक १५/०८/२०२२ चे १८.०० वा. ते १८.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ तुप्ती कपील नेवले, वय २५ वर्ष, रा. आचीत मंदीर, बसस्टाप उंदीरपुरा महाल, नागपुर ही आपले पती व दिरा सोबत एमएच— ४०/सीएच— ०२१४ क्रमांकाच्या किया सेल्टास कार ने फिरण्याकरीता नागपुर वरून रामटेक कपुरबाहुली येथे आले असता गाडी रोडवर पार्क करून पैसे गाडीमध्ये ठेवुन ते कपुरबाहुली येथे गेले. ते दर्शन घेवुन परत आले असता अज्ञात आरोपीने गाडीचे काच फोडुन गाडी मध्ये ठेवलेली निळया रंगाची पर्स ज्यामध्ये ॲप्पल कंपनीचा फोन किमंत ८०,०००/—रू., एचडीएफसी चे डेबीट कार्ड, सेन्ट्रल बॅक चे डेबीट कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, गाडीचे लायसन्स व नगदी २,०००/—रू. ठेवले होते ते घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक योगेश भुरे मो.न. ७७२२००३६७३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. वेलतुर** :– अंतर्गत १६ कि. मी. अंतरावरील मौजा पिंपळगाव रिठी शिवार येथे दिनांक १५/०८/२०२२ चे १९.०० वा. ते दि. १६/०८/२०२२ चे ०७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– प्रमोद चिंतामन मेश्राम, वय ३४ वर्ष, रा.गांधी चौक, काळेश्वर मंदिरा जवळ कुही, ता.कुही, जि.नागपूर हा काम करीत असलेल्या देशी दारुच्या दुकानाचे समोरील लोखंडी दार व शटरचे कुलूप कोंडा तोडून आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने देशी दारुच्या दुकानातून भिंगरी १८० एम.एल.च्या ५३ पेट्या ज्यावर बॅच नं.९२० असलेल्या प्रत्येकी ३३६० प्रमाणे एकुण किंमती १,५७,१४५/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतुर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि डोर्लीकर हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**